# मेट्रो-३ मार्गिकेच्या वायूविजन प्रणालीच्या कामासाठी खासगी कंपनीची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेअंतर्गत टप्पा-२ च्या बीकेसी ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांच्या वायू विजन (टनेल व्हेंटिलेशन आणि पर्यावरण नियंत्रणप्रणाली) यंत्रणेच्या उभारणीसाठी ब्लू स्टार लिमिटेड समूहाची निवड करण्यात आली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आली असल्याची माहिती एमएमआरसीतर्फे देण्यात आली.

ब्लू स्टार लिमिटेड समूहातर्फे करण्यात येणाऱ्या कामामध्ये संपूर्ण यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग इत्यादी कामांचा समावेश असणार आहे. वायू विजन यंत्रणा (टीव्हीएस) ही महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. यामुळे बोगद्यातील हवेचे तापमान नियंत्रीत ठेवण्यास मदत होणार आहे. आपत्कालिन परिस्थितीत आग आणि धुराचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने करण्यात येते.

पर्यावरण नियंत्रण प्रणाली यंत्रणेद्वारे प्रवाशांना ताजी हवा मिळणे शक्य होणार आहे. यासह आपत्कालीन परिस्थितीत धुर बाहेर सोडण्यासाठी देखील या यंत्रणेचा वापर होणार आहे.